K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
ASSESSMENT III-2023-24

GRADE: VIII
SUBJECT: MARATHI

MARKS : 50
TIME : 2 HRS

## विभाग -अ (गद्य- पद्य)

**प्र.१.अ) खालील पठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

गिर्यारोहण संस्थेच्या आपल्या साथीदारांना भेटल्यावर ईशान आणि त्याचे मित्र खूप उत्साहित झाले होते. सर्व मित्रांनी मिळून माऊंटेनिअरिंगच्या साहाय्याने उत्तर काशीहून गंगोत्रीला जाण्याचा निश्चय केला.गिर्यारोहण सुरू झाले. उच्च पहाडावर गिर्यारोहण करणे काही सोपे काम नव्हते. अनेक तासांच्या कठीण आणि थकवणाऱ्या चढाईनंतर शेवटी ते गंगोत्रीला पोहोचले. ईशान आणि त्याचे साथीदार गंगोत्रीला पोहोचल्यामुळे फार उत्साहित झाले होते आणि ते आपला सर्व थकवा विसरून गेले होते; परंतु गंगोत्रीला पोहोचल्यानंतर त्यांनी जे पाहिले, ते काळजाला घर पाडणारे दृश्य होते. पहाडामधून आलेले ढग अकस्मात फुटले आणि गंगोत्रीवर भीषण हाहाकार माजला होता. पाण्याच्या धोकादायक प्रवाहामुळे मंदिर परिसरच नव्हे, तर दुकाने, हॉटेल्स आणि धर्मशाळा उद्ध्वस्त करून टाकल्या होत्या. बरीच घरे आणि गेस्ट हाऊस नदीच्या वेगवान प्रवाहाबरोबर वाहून गेले होते. या भीषण तांडवामध्ये बरेच लोक मृत्युमुखी पडले होते. नदीने रौद्र रूप धारण केले होते.या तांडवात आपल्या आप्तेष्टांना गमावल्यामुळे लोक स्फुंदून स्फुंदून रडत होते. भूस्खलन झाल्यामुळे ठिकठिकाणी अनेक तीर्थयात्री अडकले होते. ते बिचारे चारधाम यात्रा करायला निघाले होते; परंतु येथे त्यांना सर्वस्व गमवावे लागले होते. ईशान आणि त्याच्या साथीदारांनी पहाडावर हे सर्व पाहिले, तेव्हा त्यांच्या अंगावर काटे आले आणि गिर्यारोहणाचा सर्व उत्साहच नाहीसा झाला. ईशान आणि त्याचे साथीदार ही परिस्थिती मूकपणे पाहू शकत नव्हते.

प्र.१) चौकट पूर्ण करा . (२)

१) नदीच्या वेगवान प्रवाहाबरोबर वाहून गेले → ☐

२) अनेक तासांच्या चढाईनंतर सर्व मित्र पोहोचले ते ठिकाण→ ☐

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा. (१)

१) पाण्याच्या धोकादायक प्रवाहामुळे काय काय उध्वस्त झाले होते?

प्र.३) लोक स्पूंदून का रडत होते?( कारण लिहा) (१)

प्र.४) एका शब्दात उत्तर लिहा. (३)

१) याच्या सहाय्याने काशी होऊन गंगोत्री ला जाण्याचा निश्चय केला ____

२) ठिकठिकाणी अनेक तीर्थयात्री का अडकले होते____

३) यांचा सर्व उत्साह नाहीसा झाला____

**प्र.१.आ) खालील पठीत पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा.** (७)

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी, राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत,कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार ती फुलून बघे तो व्हावे पार पसार

परि जाता जाता सुगंध संगे न्यावा तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी दयावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज कणसांच्या कानी सांगावे हितगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी गळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी टवटवी मुखावर आणावी बिलगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा

प्र.१) आकृती पूर्ण करा . (२)

१) झुळकेने भेट दिलेली नैसर्गिक ठिकाणे

१) [ ] → २) [ ] → ३) [ ] → ४) [ ]

प्र.२) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) हितगुज यांच्या कानी सांगावे____

२) नाना मौजा अशा कराव्यात _____

प्र.३) वेळूच्या वनात अलगुज वाजते____( कारण लिहा) (१)

प्र.४)अ.कवितेतून विशेषण शोधून लिहा. (१)

१) ______ झुळूक २)_____लकेर

आ. यमक जुळणारे शब्द कवितेतून शोधून लिहा. (१)

१) न्यावा ______२)सारी _______

**प्र.२.अ) खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.**

दुसऱ्या माणसाशी असलेल आपलं नातं ही खरंतर किती महत्वाची गोष्ट आहे. बहुतेकजण परस्परांमधल्या नात्याबाबत गंभीर नसतात, कारण ते आधी स्वतःचा विचार करतात आणि नंतर दुसऱ्याचा विचार करतात. दुसरे आपल्यासाठी सोयीचे असतील, सुख देणारे असतील किंवा आपल्या विचारभावनांना अवकाश देणारे असतील, तरच आपण त्यांना विचारात घेतो. बऱ्याचदा आपल्या दृष्टीने नातं ही एक अंतरावरील गोष्ट असते. आपण एखाद्याशी नात्यानं जोडलेले आहोत म्हणजे त्यांच्यात गुंतलेलो आहोत, पूर्णपणे सामावले आहोत असा अनुभव म्हणूनच आपल्याला येत नाही. खऱ्या नात्यामध्ये संवेदना विखुरलेली विभागलेली नसते, एकात्म असते. आपण नात्यात संवेदनेचे वेगवेगळे स्तर अनुभवतो.त्यांच्यामध्ये गुंतलेलो असतो.

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)

१) खऱ्या नात्यामधील संवेदनांची वैशिष्ट्ये लिहा.

१) [ ]

२) [ ]

३) [ ]

४) [ ]

प्र.२) बहुतेकजण परस्परांमधल्या नात्याबाबत गंभीर नसतात कारण________ (१)

प्र.३)बऱ्याचदा आपल्या दृष्टीने नातं ही एक ___ गोष्ट असते.(रिकामी जागा भरा). (१)

प्र.४) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) आपण दुसऱ्यांना कधी विचारात घेतो?

२) आपण एखाद्याशी नात्यानं जोडलेले आहोत म्हणजे काय?

**प्र.२.आ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार)** (८)

१) ईशान व त्याचे सहकारी यांनी यात्रेकरूंना केलेली मदत तुमच्या शब्दात लिहा .

२) तुम्हाला कोठे सफर करायला आवडेल व का? स्वमत स्पष्ट करा.

३) अतिवृष्टी किंवा दुष्काळ भूकंप या दुर्घटना झाल्यास तुम्ही काय काय कराल, स्वमत स्पष्ट करा.

४) 'तुम्हाला कोण व्हावेसे वाटते' व का स्वमत स्पष्ट करा.

५) तुम्ही जर झरा, कळी ,नदी, झुळूक झाला तर काय कराल ते सांगा.

## विभाग – ब, (व्याकरण)

**प्र.३.अ) कंसातील सूचनेनुसार कृती करा.** **(१२)**

**१) खालील अव्ययचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य बनवा.** (१)

१) म्हणून

**२) रचनेवरून वाक्याचा प्रकार ओळखा.** (२)

१) नद्यांचे पाणी खराब करू नये.

२) ईशान खाली उतरला आणि अडकलेल्या सर्वांना बाहेर काढले.

**३) अर्थावरून वाक्याचा प्रकार ओळखा.** (२)

१) आईने आज जेवायला काय बनवले?

२) अरेरे! फार वाईट झाले.

**४) समानार्थी शब्द लिहा.** (१)

१) यात्रा-

**५) विरुद्धार्थी शब्द लिहा.** (१)

१) योग्य ×

**६) वाक्प्रचारचा अर्थ सांगा.** (१)

१)मनमानी करणे

**७) खालील विरामचिन्हे ओळखा.** (१)

१)( ; )   २) ( . )

**८) वचन बदला.** (१)

१) खोल्या   २) पुडा

**९) खालील वाक्यांचा काळ ओळखा.** (१)

१) कधीही खोटे बोलू नये.

**१०) उपसर्ग व प्रत्यय लावून नवीन शब्द तयार करा.** (१)

१) दया +आळू =  २)गैर + समज =

**विभाग क - (लेखन विभाग)** **(१०)**

**प्र.४.अ) खालील विषयावर१०० ते १५० शब्दात निबंध लेखन करा.** **(६)**

१) मला सुपर पॉवर मिळाली तर ...

**प्र.४.ब) खालील विषयावर पत्र लेखन करा.** **(४)**

१) तुमच्या शाळेत साजरा करण्यात येणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन-२०२३ या कार्यक्रमासाठी लागणारे सजावटीचे सामान मागवण्याबाबत 'नाटक मंडळी कंपनी', लालबहादूर शास्त्री मार्ग, औरंगाबाद या कंपनीच्या व्यवस्थापकांना मागणी पत्र लिहा.

किंवा

**प्र.४.ब) खालील शीर्षकावरून कथा तयार करा व तात्पर्य तुमच्या शब्दात लिहा.** **(४)**

१) कष्ट व समर्पण